

# मसानोबू फुकुओका

'वन स्ट्रॉ रिव्होल्यूशन' या आपल्या विचार प्रवर्तक पुस्तकानं मसानोबू फुकुओका हे जपानी शेतकरी जगभर प्रसिध्द झाले. त्यांनी आपल्या प्रयोगांमधून जगभरातल्या पर्यावरणवाद्यांसाठी नैसर्गिक शेतीचा नवा मंत्र दिला.फुकुओकांच्या पुस्तकामुळे आम्ही तीन मित्र प्रभावित झालो. १९८७ साली थोडीशी पडीक जमीन विकत घेतली आणि आम्ही थेट तज्ञ या पातळीवरून नैसर्गिक शेतीची सुरुवात केली. नैसर्गिक शेतीतले आमचे जगावेगळे प्रयोग पाहून आसपासच्या ग्रामस्थांचे शेती विषयक ज्ञान किती वाढले याची मला कल्पना नाही, पण त्यांचे मनोरंजन मात्र भरपूर झाले.नशीबानं त्या पंचक्रोशीत आम्हाला अधिक अनुयायी मिळाले नाहीत , अन्यथा संपूर्ण जिल्हयाची शेती विषयक अर्थव्यवस्था तहस नहस करण्याची ताकद आमच्या प्रयोगांत होती! अर्थातच योग्य तत्वं चुकीच्या पध्दतीनं राबवण्याचा दोष आमचाच होता, फुकुओकांचा नव्हे.

१९९४ साली मुंबईला आले असतांना फुकुओका यांचं दर्शन घेण्याचं भाग्य मला मिळालं. दोनदा शून्यतेचा साक्षात्कार झालेला हा नव्वद वर्षांचा तेजःपुंज शेतकरी.त्यांच्या बैठकीच्या खोलीमध्ये शिरलो तेव्हा फुकुओकासान Tombow चा ब्रशपेन घेऊन भोवतालच्या लोकांना कागदावर चित्रे काढून आपलं म्हणणं समजावून देत होते.मी ही बरोबर कागद आणि पेन घेऊनच गेलो होतो. त्यांचे कॅरिकेचर काढून मी त्यांच्या समोर धरले. फुकुओकांनी आपल्या जाड चष्म्यातील बारीक डोळयांनी ते चित्र नीट निरखले आणि त्यावर आपला संदेश लिहून ते मला परत केले. हा कागद म्हणजे मला मिळालेला एक दैवी प्रसाद आहे. त्यांनी लगेच दुसरा कागद माझ्याकडून मागून घेतला आणि ब्रशपेनचे फटकारे मारत पटकन दुसरे एक चित्र काढून मला दिले. दुभाषी मुलीच्या मार्फत त्यांनी मला त्या चित्राचा अर्थ लागतो कां, असे विचारले. मला जो कळला तो अर्थ मी त्यांना सांगितला. फुकुओकांनी 'बरोबर' अशा अर्थानं मान हलवली आणि ते म्हणाले, 'ओझं जड आहे की हलकं हे ओझ्यावर नव्हे, ओझं उचलणाऱ्याच्या मनावर अवलंबून आहे.'





फुकुओकासानांच्या पुढयातला टी पॉय मी बाजूला सारला आणि त्यांच्या पावलांवर डोकं टेकवलं. परमेश्वराच्या दगडी मूर्तीच्या पायावर डोकं टेकवल्याची थंडगार लहर शरीरात पसरून गेली.फुकुओकांच्या दर्शनाला जमलेल्या हॉलमधल्या प्रत्येकाला खरंतर तसं करायचं होतं, पण शहरी सभ्यता, संकोच वगैरे वेडगळ लोढणी त्यांनी गळयात बांधून घेतलेली होती. ही कोंडी फुटताच नमस्कार करण्यासाठी लोक भराभर पुढे झाले आणि त्यांना आवरता आवरता फुकुओकासान आणि त्यांच्या बरोबरच्या दुभाषी मुलीची त्रेधा उडाली!

फुकुओकांच्या 'वन स्ट्रॉ रिव्होल्यूशन' चा श्री. वसंत पळशीकरांनी केलेला अनुवाद 'एका काडातून क्रांती' पुण्याच्या परिसर प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. त्यांचप्रमाणे नव्या पर्यावरणवादी विचार प्रणालीची मांडणी करणारी काप्रा यांची ' टर्निंग पॉईंट' व 'द वेब ऑफ लाइफ' ही पुस्तकंही जिज्ञासूंनी अवश्य वाचावी.

***